**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.विलास दत्तात्रय दळवी
घर नं.२०१८, २९-२६, राजारामपुरी, पाचवी गल्ली,
जि.कोल्हापूर-४१६००८ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कल्लाप्पा आवाडे इचलकरंजी
जनता सहकारी बँक लि. इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ३३/कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

३.**उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय दळवी
घर नं.२०१८, २९-२६, राजारामपुरी, पाचवी गल्ली,
जि.कोल्हापूर-४१६००८

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, पुणे यांचेकरिता श्री.प्रकाश अष्टेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कल्लाप्पा आवाडे इचलकरंजी
जनता सहकारी बँक लि. इचलकरंजी, जि.कोल्हापूर तर्फे वकील श्री.स्वानंद कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.१८.२.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.-- |
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि. १९.४.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. १५.५.२००६ |

८. **मूळ मागणीचा तपशील**

१.बँकेचे चेअरमन / जनरल मॅनेजर /शाखाधिकारी अथवा अन्य अधिकाऱ्यांनी सहजीवन सहकारी गृहरचना निर्माण संस्था मर्यादित, कोल्हापूर आणि श्री.व्ही.एच.ढेरे यांना पाठविलेली पत्रे किंवा किंवा नोटीस यांच्या सत्यप्रती

२.बँकेचे कायदे सल्लागार अगर लिगल सेलला दिलेली पत्रे अगर सूचना व त्यांचेकडून बँकेला मिळालेला कायदेशीर सल्ला./अभिप्राय

३.बँकेचे संचालक मंडळ/चेअरमन /जनरल मॅनेजर व शाखाधिकारी यांची कर्तव्ये व अधिकार या संदर्भातील पोटनियमातील तरतुदी आणि त्या संदर्भात संचालक मंडळाने अधिकार वाटपासंबंधी भाष्य केले असल्यास त्या ठरावांच्या प्रती.

४.दि.२३.६.१९९७ व १.११.२००२ रोजी श्री.व्ही.एम.ढेरे यांनी वर दिलेलल्या सहजीवन संस्थेच्या चेक संदर्भात कारवाई करणेबाबत अगर न करणेबाबत पोट समिती / संचालक मंडळाने केलेले ठराव सभेत हजर यादीसह.तसेच संचालक मंडळ /पोटसतिमती समोर विचारार्थ ठेवलेल्या टिपण्या अभिप्राय.

## विवेचन

नागरी सहकारी बँकांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ निर्णय लागू नाही हे सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसारचे प्रतिपादन राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी पूर्वी अन्य निर्णयात मान्य केले आहे. तसेच नागरी सहकारी बँकांना हा कायदा लागू असल्याच्या काही निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात अर्ज दाखल झालेले आहेत. हे लक्षात घेता तूर्त राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या निर्णयाप्रमाणे स्थिती आयोग कायम ठेवत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकारी यांनी सहकार कायदा कलम ३२ प्रमाणे देय असलेली माहिती अपीलकर्ता यांना द्यावी व त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

कोल्हापूर
दि.१६.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मानसिंग यादवराव पवार
२२, राजमाता सुमित्राराजे गृहनिर्माण सोसायटी,
शाहूनगर, गोडोली, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, जानाईदेवी शिक्षण संस्था,
चिंचणेरवंदन, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३+३४ / सातारा /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मानसिंग यादवराव पवार
२२, राजमाता सुमित्राराजे गृहनिर्माण सोसायटी,
शाहूनगर, गोडोली, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, जानाईदेवी शिक्षण संस्था,
चिंचणेरवंदन, सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ (अ.क्र.३३)<br>दि.२१.३.२००६ (अ.क्र.३४) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६ (अ.क्र.३३)<br>दि.--- (अ.क्र.३४) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.३.२००६ ( अ.क्र.३३)<br>दि.३०.६.२००६ ( अ.क्र.३४) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.११.२००६( अ.क्र.३३)<br>दि. .१२.२००६( अ.क्र.३४) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.३३+३४/सातारा**

१.१९८५ ते २००० सालात शाळा इमारत बांधकामासाठी शिक्षक / शिक्षकेतर सेवकांच्याकडून घेतलेल्या अनुक्रमे १०,०००/- रु. व ५०००/- रु.च्या देणगी पावत्यांच्या झेरॉक्स.

२. सन १९८५ ते २००० सालात नेमलेल्या तीन शिक्षक व चार शिक्षकेतर सेवकांचेकडून नेमणुकांसाठी घेतलेल्या प्रत्येकी एक लाख ते दीड लाख रुपयेच्या संस्थेकडील जमा पावत्या झेरॉक्स.

३.२००५-२००६ मधील विद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर सेवक सेवाज्येष्ठता यादी.

४.अजिंक्य सहकारी साखर कारखान्याने इमारतीसाठी दिलेल्या रु.५०,०००/- ची संस्था जमा पावती झेरॉक्स.

५.सन १९८५ ते २००० अखेर संस्थेने कोर्ट केसेससाठी केलेल्या खर्चाच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती.

६.दि.१३.८.२००० सालात निवडलेल्या कार्यकारी मंडळास आपण दिलेल्या दप्तराची चार्जयादी झेरॉक्स.

## विवेचन

सन १९८५ ते २००० अखेर या कालावधीतील जानाईदेवी शिक्षण संस्था, चिंचणेरवंदन, सातारा या संस्थेतील शिक्षक-शिक्षकेतर सेवकांकडून इमारत निधीसाठी घेतलेल्या रकमेचा तपशील, त्यांच्या नेमणुकीसाठी घेतलेल्या रकमांच्या जमा पावत्यांच्या प्रती इ. माहिती अपीलकर्ता श्री.मानसिंग यादवराव पवार यांनी संस्थेचे मानद सचीव श्री.मुकुंद अनंत कुलकर्णी यांच्याकडे मागितली होती. त्यांच्याकडून ती माहिती न मिळाल्यामुळे श्री.पवार यांनी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सह धर्मादाय आयुक्त यांच्याकडे माहिती मागितली. संस्थेचे आधीचे सचीव श्री.मुकुंद अनंत कुलकर्णी यांनी ही माहिती अद्याप कार्यालयास सादर केलेली नाही, त्यामुळे देता येत नाही, असे अधीक्षक, सह धर्मादाय आयुक्त कार्यालय यांनी कळविले. त्याविरुध्द श्री.पवार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह धर्मादाय आयुक्त, सातारा यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपील फेटाळले. हीच माहिती मागण्यासाठी श्री.पवार यांनी संस्थेचे सचीव श्री.बबन निवृत्ती महाडीक यांच्याकडे अर्ज केला. त्यांनी ती माहिती नाकारली. त्याविरुध्द श्री.पवार यांनी जानाईदेवी शिक्षण संस्था, चिंचणेरवंदन, सातारा या विश्वस्त संस्थेचे नियंत्रक अधिकारी म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा सह धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याबाबत त्यांनी संस्थेच्या सचिवांना कळवूनही सचिवांनी ही माहिती नाकारली. या दोन्ही संदर्भात श्री.पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आपण मागितलेली माहिती श्री.मुकुंद अनंत कुलकर्णी यांच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे त्यांच्याकडे मागितली होती, असे श्री.पवार यांनी सांगितले. संबंधित माहिती संस्थेच्या सचिवांकडून घ्यावी, असे श्री.कुलकर्णी यांनी श्री.पवार यांना कळविले होते. त्यानुसार आपल्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली, असे श्री.महाडीक यांनी नमूद केले. संबंधित माहिती मिळवून देण्याबाबत आपल्या कार्यालयाने संपूर्ण प्रयत्न केले, आवश्यक तर संबंधित संस्थेवर कारवाई करण्याचा इशाराही दिला. परंतु विद्यालयाच्या कक्षेतील माहिती असल्यामुळे ती सह धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे उपलब्ध असत नाही. न्यायिक प्रक्रिया असेल तर माहिती देण्यास सक्ती करु शकतो; अन्यथा विश्वस्त संस्थांची संख्या, त्याबाबतचे कामकाज व उपलब्ध कर्मचाऱ्यांची संख्या याचा

विचार करता प्रत्येक विश्वस्त संस्थेकडून अशी माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही, असे सह धर्मादाय आयुक्त श्री.प्रकाश तिजारे यांनी नमूद केले.

या सर्व विषयाला संस्थेच्या अंतर्गत वादाची पार्श्वभूमी आहे, हे सर्व संबंधितांच्या निवेदनामधून व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. श्री.मुकुंद कुलकर्णी यांनी सर्व अभिलेख अद्याप आपल्या ताब्यात दिले नसल्याचे श्री.महाडीक व संस्थेचे उपाध्यक्ष श्री.शंकर बळवंत कदम यांनी सांगितले. आपण सर्व कागदपत्रे संस्थेच्या पुढील सचिवांकडे सुपूर्त केल्याचे श्री.कुलकर्णी यांचे म्हणणे आहे. श्री.पवार हे १९७२ ते १९८७ या काळात सदर विद्यालयात मुख्याध्यापक होते. भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन चौकशी करुन संस्थेने त्यांना पदावरुन दूर केले आहे, म्हणून त्रास देण्यासाठी ते अशा प्रकारचे अर्ज व दावे करीत असतात, असेही प्रतिपादन श्री.महाडीक व श्री.कदम यांनी केले. श्री.पवार यांनी संस्थेविरुध्द उच्च न्यायालयासह अनेक ठिकाणी केलेल्या दाव्यांमध्ये त्यांच्याविरुध्द निर्णय लागला असल्याचेही निवेदन त्यांनी केले. संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार असून तो उघडकीला न आल्यास संस्था बंद पडण्याची शक्यता आहे, अशी गावकऱ्यांमध्ये भावना आहे. अशा कारभाराला प्रतिबंध व्हावा म्हणून आपण प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन श्री.पवार यांनी केले. आपण संस्थापक सदस्य आहोत, असे श्री.पवार यांचे म्हणणे आहे. मात्र श्री.पवार संस्थापक सदस्य कधीही नव्हते. सन १९८४-८५ साली ते सामान्य सभासद झाले. त्यांच्या मुख्याध्यापक पदाच्या काळात संस्थेच्या हिताला बाधक कृत्य केल्याने सन २००० मध्ये त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात आले, असे संस्थेचे म्हणणे आहे. नेमणुकीसाठी कोणाकडूनही पैसा घेतलेला नाही, त्यामुळे अशा प्रकारची माहिती देणे शक्य नाही. मात्र योग्य ते शुल्क न भरताही त्यांना काही माहिती दिली असून अन्य माहितीसाठी संस्थेचे अभिलेख निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येतील, असे संस्थेच्या विद्यमान मुख्याध्यापकांनी दि.१३.१२.२००७ च्या पत्रान्वये श्री.पवार यांना कळविले आहे. हे पत्र संस्थेने सादर केले.

वरील विवेचन लक्षात घेता संस्थांतर्गत वादात माहितीच्या अधिकाराचा वापर केला जात आहे, असे दिसते. मात्र असे असले तरी त्यामुळे देय माहिती नाकारता येणार नाही. अपीलकर्त्यास काही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. ऊर्वरित माहितीसाठी अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक त्या प्रती घेण्याचा मार्ग अपीलकर्त्यास उपलब्ध आहे. विद्यालयांतर्गत तपशीलवार

माहितीची अपेक्षा सह धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून करणे योग्य नाही. मात्र एखादी सार्वजनिक विश्वस्त संस्था सार्वजनिक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देत नसेल तर त्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत, तसेच प्रशासकीय नियंत्रणांतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर सह धर्मादाय आयुक्त कार्यालयाने केला पाहिजे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अंतर्भूत असलेल्या पारदर्शकतेच्या तत्त्वानुसार ते अपेक्षित व आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्त्यास विद्यालयाच्या अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेता येईल. असे अवलोकन करण्यास व अपेक्षित माहिती संस्थेने नि:शुल्क द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.५.२००८

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ

क्रमांक :अपील-३३७/कोल्हापूर/०८
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१
दुरध्वनी क्रमांक २६०५०६३२
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिनांक : 31.05.२००८

प्रति,

श्री.सुधाकर कृष्णा कुलकर्णी
११८५/ख-२, राजारामपुरी २ री गल्ली,
जि.कोल्हापूर

विषय :- माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३)
अन्वये दाखल केलेले अपील
संदर्भ :- आपला द्वितीय अपील (क्रमांक ३३७/कोल्हापूर),
दि.०७.०४.२००८ चा अर्ज

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपण राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेला संदर्भाधीन अपीलाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण दि.२४.०१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील क्रमांक ७१/कोल्हापूर या अपिलातील विषय व संदर्भाधीन विषय हा एकच आहे. सदर अपील दि.३१.१०.२००७ रोजी निकाली काढल्याबाबत या कार्यालयाने पत्रान्वये आपणास कळविले आहे. तसेच आपणास याबाबत दि.०३.०५.२००८ च्या पत्रानुसार आपणाकडून जी कार्यवाही होणे अपेक्षित आहे, त्याबाबत कळविलेले आहे. तरी तरी आपले संदर्भाधीन अपील मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ, यांचे निदेशानुसार सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

निर्गमित करण्यात [illegible]
व स्वाक्षरी 2/6/08

आपला,
(स्वाक्षरी)
(य. ह. देशपांडे)
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

का.५
आवक
3-6-08

प्रत :

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ**

क्रमांक : अपील-३४३,३४४/सातारा/२००८
राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१
दुरध्वनी क्रमांक २६०५०६३२
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२
दिनांक : २२.०५.२००८

प्रति,

अध्यक्ष,
राजवैभव प्रतिष्ठान औंध,
ता.खटाव, जि.सातारा

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अपीलाबाबत...**

संदर्भ :- आपले दि.०३.०५.२००८ ची दोन अपीले

महोदय,

आपण राज्य माहिती आयोगाकडे संदर्भाधीन दिनांकास दोन अपीले दाखल केली असून सदरहू अपीले पदनामाने केलेली आहेत. सदर अपीलाच्या अनुषंगाने मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की पदनामाने अर्ज वा अपील न करता नागरिकाने ते नावाने करणे आवश्यक आहे.

आपले दि.०३ मे, २००८ चे मूळ अपील अर्ज या पत्रासोबत परत पाठविण्यात येत आहे.

आपला,

(य. ह. देशपांडे)
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

23/5/08

निर्गमित केल्याचा दिनांक
व स्वाक्षरी

का ५
अविरा
22-05-08

सोबत : सहपत्र वरीलप्रमाणे

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ

क्रमांक : अपील-३५२/सातारा/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१
दुरध्वनी क्रमांक २६०५०६३२
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२

दिनांक : २२.०५.२००८

प्रति,

श्री. अरविंद शंकर गोडसे,
शेतकरी चौक वडूज,
ता. खटाव, जि.सातारा

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५**
**अंतर्गत केलेल्या अपिलाबाबत...**

संदर्भ :- दि.०८.०५.२००८ चा अर्ज

महोदय,

संदर्भाधीन पत्रानुसार आयोगाकडे पाठविलेल्या वित्तीय अपीलातील विषय माहितीचे अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नसल्याने मा.आयुक्त यांचे निदेशानुसार आपला अपील अर्ज दाखल करुन घेता येत नाही. सदर अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आपला,

( य. ह. देशपांडे )
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

२६।५।०८

जा. प्र. आवेश

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ,पुणे खंडपीठ

क्रमांक : अपील-३५२/सातारा/२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१
दुरध्वनी क्रमांक २६०५०६३२
फॅक्स क्रमांक : २६०५०६३२

दिनांक : २२.०५.२००८

प्रति,

श्री. अरविंद शंकर गोडसे,
शेतकरी चौक वडूज,
ता. खटाव, जि.सातारा

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अपिलाबाबत...**

संदर्भ :- दि.०८.०५.२००८ चा अर्ज

महोदय,

संदर्भाधीन पत्रानुसार आयोगाकडे पाठविलेल्या वित्तीय अपीलातील विषय माहितीचे अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नसल्याने मा.आयुक्त यांचे निदेशानुसार आपला अपील अर्ज दाखल करुन घेता येत नाही. सदर अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आपला,

(य. ह. देशपांडे)
कक्ष अधिकारी,
राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

२८/५/०८

ओ/५
आवक
२६-५-०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत तुकाराम आनंदे
सोपाननगर संगीत विद्यालयाजवळ,
मु.पो.सासवड, ता.पुरंधर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६४ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत तुकाराम आनंदे
सोपाननगर संगीत विद्यालयाजवळ,
मु.पो.सासवड, ता.पुरंधर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर, जि.पुणे
**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.७.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>सासवड येथील स.नं.५अ १/९ मध्ये कबजेदार सदरी व इतर हक्कातील सर्वांचे रजिस्टर खरेदीखताच्या प्रती व सर्वांचे फेर फार उतारे मिळणेबाबत. |
|---|---|

## विवेचन

अपीलकर्ता यांनी त्यांना खरेदीखताची छायांकित प्रत व स.नं.५अ/१/९ या सासवड येथील जमिनीचे फेरफाराचे उतारे मिळण्याबाबत केलेल्या अर्जास जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य उत्तर दिले नाही व माहितीही दिली नाही म्हणून अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही आपल्याला माहिती दिली नाही यास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी हजर राहून आयोगासमोर निवेदन केले. अपीलकर्ता यांना खरेदीखताची छायांकित प्रत देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी दुय्यम निबंधक, पुरंदर यांना कळविले व फेरफाराचे उतारे घेऊन जाण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. अपीलकर्त्याने फेरफाराचे उतारे नेले नाहीत, खरेदीखताच्या प्रतीबाबत दुयम निबंधकांनी कार्यवाही केली नाही व अपीलकर्त्यानेही त्यांच्याकडे पाठपुरावा केला नाही. फेरफारात आपले नाव नोंदवावे, ही अपीलकर्त्याची मुख्य मागणी आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली.

(२) जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेले सं.नं.५अ/१/९ या जमिनीचे फेरफाराचे उतारे अपीलकर्त्याने पूर्वीच घ्यावयास हवे होते. ते घ्यावे.

(३) दुय्यम निबंधक, पुरंदर यांच्याकडून अपीलकर्ता यांच्या संबंधित असलेली खरेदीखताची छायांकित प्रत घेऊन ती अपीलकर्ता यांना एका आठवड्यात द्यावी. अपीलकर्ता यांना पाहिजे असणाऱ्या ७/१२ वरील इतर कबजेदारांच्या खरेदीखताच्या छायांकित प्रती त्यांनी संबंधितांचा ना हरकत दाखला आणल्यानंतर त्यांना देण्यात याव्यात, त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.५.२००८**

मे-२००८-७५७६

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६५ /पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री.अरविंद भिकाजी भोर<br>मु.पो.नारायणगाव,(कुकडी वसाहत) ता.जुन्नर जि.पुणे |
| ३ | जन माहिती अधिकारी | पुनर्वसन अधिकारी क्र.१<br>अहमदनगर, जि.अहमदनगर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा पुनर्वसन अधिकारी, अहमदनगर, जि.अहमदनगर |

अपीलकर्ता श्री. अरविंद भिकाजी भोर यांनी मौजे रेनवडी, ता. पारनेर येथील गट क्र. २८३ मध्ये धरणग्रस्तांना वाटप केलेल्या जमीनीच्या ताबेपावत्या व गट क्र. २८३ चा ७/१२ क्षेत्राप्रमाणे सर्व हिस्सेदर्शक फाळणी नकाशा मिळणेबाबत माहिती मागितली होती. प्रस्तुत कार्यक्रमास जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता उपस्थित होते. अपीलकर्त्यास फाळणी नकाशा देण्यात आला आहे. परंतु अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळावा व त्याची पावती मिळावी, अशी अपीलकर्त्याची मागणी आहे. ताबा देण्या - न देण्याचा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. जन माहिती अधिकाऱ्याने अपीलकर्त्यास १५ दिवसांच्या आत माहिती देण्याचे मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य.

२. जन माहिती अधिकाऱ्यांनी मान्य केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास ऊर्वरित माहिती देऊन त्याबाबत अनुपालन अहवाल दि. १२.६.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.** [illegible] .५.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३७०/पुणे |
| २ | अपील कर्ता | श्री.अशोक साधुराम मुलचंदानी ,<br>१०४, रवी हौसिंग सोसायटी, अशोक थियटर जवळ,<br>पिंपरी कॉलनी, पुणे-१७ |
| ३ | जन माहिती अधिकारी | जिल्हाधिकारी यांचे प्रमुख लिपिक,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे |

अपीलकर्ता श्री. अशोक साधुराम मुलचंदानी यांनी जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता, पुणे या पदासाठी माहे ऑक्टोबर २००५ ते माहे जून २००६ या कालावधीत नियुक्त करावयाच्या अभियोक्ता मंडळासाठी जिल्हा सत्र न्यायाधीश यांनी शिफारस केलेल्या ९ उमेदवारांच्या नावांसंबंधित माहिती विचारली होती. वरील तीनही घटकांमधील चर्चेअंती अपीलकर्त्याने आपल्याला माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१ .५.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. २६.५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८६ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. शरद रामण्णा शेट्टी<br>१४, वीरभद्र नगर, बाणेर, पुणे : ४११ ०४५ |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रमुख लिपिक, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय,<br>पुणे विभाग, पुणे |

अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या कार्यप्रणाली व अधिकार तसेच आपल्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्याने माहितीसाठी आवश्यक रक्कम भरण्याबाबत कळविले होते. परंतु श्री. शेट्टी यांनी ही रक्कम भरली नाही. त्यांनी ती भरणे आवश्यक होते. विहित मुदतीत कळविलेले शुल्क न भरता अपील करण्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्याने विहित शुल्क जमा केल्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यानी माहिती उपलब्ध करून द्यावी.

**पुणे**
दि. ३१ .५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, प्लॉट नं.१४,
ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, कार्यासन क्र२,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ३९ / कोल्हापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

३.उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री.मिलिंद पाठक

**जन माहिती अधिकारी** तथा अव्वल कारकून, कार्यासन क्र. २,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री.संजय सुधाकर कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.६.२.२००६ |
| ५. | जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि.-- |
| ६. | अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.३.४.२००६ |
| ७. | अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |

८. **मूळ मागणीचा तपशील**

श्री.व्ही.बी.देशपांडे, प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडहिंग्लज यांच्याविरुध्द सबळ पुरावा उपलब्ध असतानासुध्दा त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र पाठविले नाही. या गुन्ह्याच्या कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती मिळाव्यात. प्रकरणातील माहिती देण्यात कसूर करणाऱ्या व जबाबदार अधिकाऱ्याचे नाव, पद आणि ते ज्या आदेशाने तेथे रुजू झाले त्या आदेशाची छायांकित प्रत.

## विवेचन

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडहिंग्लज या संस्थेतील प्राचार्यांवरील गुन्हा दाखल होण्याच्या संदर्भात लोकशाही दिनात दिलेल्या अर्जाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी मागितली होती. संबंधित अर्ज पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्याचे व अनुषंगिक माहिती त्यांच्याकडून घेण्याचे सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी श्री.निकम यांना कळविले. त्याविरुध्द श्री.निकम यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले. आपल्याला पोलिसांकडूनच माहिती घ्यावयाला सांगण्याऐवजी माहितीचा अधिकार अधिनियम कलम ६ मधील तरतुदीनुसार पाच दिवसात अर्ज त्यांच्याकडे पाठविणे आवश्यक होते, ते सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांनी केले नाही. तसेच अपिलीय प्राधिकाऱ्यानी त्यांना समज दिली, परंतु कडक कारवाई केली नाही, म्हणून श्री.निकम यानी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

तत्कालीन सहाय्यक माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय श्री.द.अ.बोंगाळे आता सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.डी.के.शिंदे हेही सेवानिवृत्त झालेले आहेत. श्री.बोंगाळे यांच्यावर राजशिष्टाचाराची व अन्य कार्यालयीन जबाबदारी असल्यामुळे त्यांच्याकडून अर्ज पोलीस अधीक्षकांकडे पाठविण्यास विलंब झाला, परंतु तो हेतुपुरस्सर नव्हता असा खुलासा तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.डी.के.शिंदे यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री.पाठक यांनी त्याच स्वरुपाचे निवेदन केले. माहिती मागणीच्या

अर्जाची नीट हाताळणी केली नाही, यापुढे दक्षता घ्यावी म्हणून हे अपील केले असे श्री.निकम यांनी नमूद केले. अशी दक्षता घेतली जाईल, असे निवेदन श्री.पाठक यांनी केले. वस्तुत: संबंधित अधिकाऱ्यांबरोबरच्या चर्चेनेही हे साध्य झाले असते, त्यासाठी राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याची गरज भासता कामा नये. अपिलाचा विषय, त्याचे गांभीर्य व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अपेक्षित असलेले परिणाम, संबंधित यंत्रणांचा वेळ याचा विचार करता अपीलकर्त्याने याची दखल घ्यावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

कोल्हापूर
दि.१७.५.२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

श्री.बबन बहिरु कदम,
मु.प्रभुचीवाडी, पो.खर्शी,
तर्फ कुडाळ,ता.जावळी,
जि. सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,
ता.जावळी, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
ग्रामसेवक,
खर्शी तर्फ कुडाळ,
ता.जावळी (मेढा), जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २४.१०.२००७ |
| ३ | उपस्थित<br>अपीलकर्ता श्री.बबन बहिरु कदम, मु.प्रभुचीवाडी, पो.खर्शी, तर्फ कुडाळ,ता.जावळी, जि. सातारा<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, ता.जावळी, जि. सातारा<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, खर्शी तर्फ कुडाळ, ता.जावळी (मेढा), जि.सातारा | |
| ४ | जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.०७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.०७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.०९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.१०.२००६ |

**मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

माझे नावे असलेली मिळकत सन १९९२ पासून अरुण बहिरु चोरगे यांचे नावावर कशी केली . उत्तम बहिरु व मी घर बांधले व समान नोंदणीस अर्ज दिले होते. त्यात (क्षेत्रफळ) कमी जास्त कसे झाले, घरामागील मोकळ्या जागेची क्षेत्रफळात नोंद का नाही.

## विवेचन

वहिवाटीप्रमाणे मिळकतीची नोंद होण्याच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.बबन बहिरु कदम, मु.प्रभुचीवाडी, पो.खर्शी, तर्फ कुडाळ,ता.जावळी, जि. सातारा यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांच्याकडे मागितली होती. योग्य माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जावळी, ता.जावळी, जि.सातारा यांच्याकडे अपील केले. वहिवाटीप्रमाणे मिळकतीची नोंद व्हावी, ही श्री.कदम यांची मुख्य मागणी असल्यामुळे अपिलीय प्राधिका-यांनी दप्तर तपासण्यासाठी चौकशी अधिकारी नेमले. त्यानंतरही समाधानकारक माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.कदम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यानच्या काळात ग्रामसेवकाकडून आपल्याला सर्व माहिती मिळाली असून आपली कोणतीही तक्रार राहिलेली नाही, असे श्री.कदम यांनी सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही व माहिती मिळाल्याने अपील निकाली काढावे अशी लेखी व तोंडी विनंती अपीलकर्त्याने केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. ०९.०५.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे : ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.०५.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४१७ /पुणे |
| २ | अपील कर्ता | श्री.पिराजी नामदेव सरोदे<br>४२१, शुक्रवार पेठ, तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे ४१० ५०६ |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी, तळेगांव दाभाडे नगरपरिषद, तळेगांव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे ४१०५०६ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे-१ |

सदर कार्यक्रमास अपीलकर्ता गैरहजर होते. ऊर्वरित दोन्ही घटक हजर होते. अपीलकर्ता श्री. पिराजी नामदेव सरोदे यांनी त्यांच्या सेवाविषय संबंधात एकूण २८ मुद्दयांची माहिती मागितली होती. तसेच त्यांनी माहिती अधिकाराखाली वेळोवेळी एकूण २६ अर्ज नगरपरिषदेकडे दाखल केले आहेत. त्यामध्ये एकूण ३५० ते ४०० मुद्दयांची माहिती संकलित करून दिलेली आहे. तसेच अपिलाच्या अनुषंगाने माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करून दिलेली आहे, असे जन माहिती अधिकाऱ्याने आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्याने एकाच प्रकारची माहिती वारंवार मागणी करणे आणि त्या अनुषंगाने अपिले करणे ही कृती योग्य नाही. याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३१ .५.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**